
# तहसील कार्यालय वडवणी:अधिकाऱ्यांची खुलेआम दांडी यात्रा

## सकाळचे साडेदहा वाजूनही कार्यालय ओस; गोरगरीब जनतेचा संताप अनावर







वडवणी । दिव्य न्युज

तालुक्याच्या कारभाराचे केंद्र असलेल्या तहसील कार्यालय वडवणी येथे आज सकाळी प्रशासनाचा ढिसाळ आणि बेजबाबदार चेहरा उघड झाला. सकाळचे साडेदहा वाजूनही एकही जबाबदार अधिकारी किंवा कर्मचारी कामावर हजर नसल्याने संपूर्ण कार्यालयात शुकशुकाट पसरला होता. टेबल-खुर्च्या रिकाम्या, फाईली धुळ खात पडलेल्या आणि कामकाज पूर्णतः ठप्प - हे चित्र पाहून नागरिक संतप्त झाले.

शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी, उत्पन्न-जात प्रमाणपत्र, शिधापत्रिका, पेन्शन, नैसर्गिक आपत्ती मदत, जमिनीचे प्रश्न यासाठी गोरगरीब, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक दूरदूरच्या गावांतून येतात. मात्र येथे पोहोचल्यावर त्यांना मिळते ते फक्त फेऱ्या, वेळेचा अपव्यय आणि अपमानास्पद वागणूक. अधिकाऱ्यांची वेळ मात्र जनतेपेक्षा मौल्यवान आहे का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. नियम, वेळ आणि शिस्त फक्त सामान्य नागरिकांसाठीच आहेत का? कार्यालयीन वेळ सकाळी स्पष्टपणे ठरवलेली असताना अधिकाऱ्यांची ही दांडी यात्रा कोणाच्या मर्जीने सुरू आहे? वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण आहे की नाही, असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. तहसील कार्यालय म्हणजे जनतेसाठी न्याय आणि मदतीचे केंद्र; मात्र वडवणीत हेच कार्यालय जनतेसाठी छळछावणी बनत चालल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. याआधीही कामकाजाबाबत अनेक तक्रारी करूनही प्रशासनाने डोळेझाक केल्याने अधिकाऱ्यांचे मनोबल वाढले असून ते खुलेआम नियम धाब्यावर बसवत आहेत. या गंभीर प्रकाराकडे जिल्हाधिकारी व महसूल विभागाने तात्काळ दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे. जनतेचा संयम आता संपत चालला असून प्रशासनाने वेळीच जागे न झाल्यास त्याची जबाबदारी पूर्णतः शासनाची असेल.

# औरंगाबाद शैक्षणिक एक्स्पोमध्ये पठाण शरीफ खान यांचा गौरव



जालना । दिव्य न्युज

शाळा, पेन्शनपुरा, जालना येथील सहाय्यक शिक्षक तसेच शैक्षणिक व पत्रकारितेच्या क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व पठाण शरीफ खान यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक सेवांच्या गौरवार्थ महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार (२०२१) प्रदान करण्यात आला होता. या सन्मानाच्या निमित्ताने उर्दू कारवाँ आणि माइंड्स इन मोशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने (औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगरयेथे आयोजित शैक्षणिक एक्स्पोदरम्यान १४ डिसेंबर रोजी एक भव्य अभिनंदन समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात पुरस्कारप्राप्त मान्यवरांसह विशेषतः पठाण शरीफ खान यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य उर्दू अकादमीचे अध्यक्ष हुसेन अख्तर फरीद अहमद खान (उर्दू कारवाँ, मुंबई), डॉ. मझहर फारुकी (प्राचार्य, मौलाना आझाद कॉलेज, औरंगाबाद), ॲड. फैज सैयद (अध्यक्ष, इस्लामिक रिसर्च सेंटर) आदी मान्यवरांनी उपस्थिती होते यावेळी उर्दू कारवाँ आणि माइंड्स इन मोशन फाउंडेशनच्या वतीने पठाण शरीफ खान यांना अभिनंदन शिल्ड व स्मृतिचिन्ह प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक, साहित्यिक व पत्रकारितेतील कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास उपस्थित शिक्षक, साहित्यिक, विचारवंत व सामाजिक कार्यकर्त्यांनी पठाण शरीफ खान यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ यांची अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेस सदिच्छा भेट ;संस्थेच्या प्रगतीचे केले कौतुक





अंबाजोगाई । दिव्य न्युज

अंबाजोगाई शहरातील ज्येष्ठ समाजसेवक आणि 'दैनिक विवेक सिंधू'चे संस्थापक संपादक प्रा. नानासाहेब गाठाळ यांनी नुकतीच शहरातील प्रतिष्ठित अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेस सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी पतसंस्थेच्या कामकाजाची पाहणी केली आणि संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

या भेटीप्रसंगी अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष उमर फारूक सर यांनी प्रा. गाठाळ यांचे स्वागत केले. त्यांनी पतसंस्थेचा चढता आलेख, ग्राहकांसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध ठेवी व कर्ज योजना, संस्थेची भक्कम आर्थिक स्थिती आणि सामाजिक बांधिलकीतून सुरू असलेले उपक्रम याविषयी सविस्तर माहिती दिली. सहकार क्षेत्रात पारदर्शक कारभार आणि ग्राहकांचा विश्वास जपल्यास संस्था कशी प्रगती करू शकते, याचे उत्तम उदाहरण अलखैर पतसंस्थेने निर्माण केले असल्याचे मत यावेळी प्रा. गाठाळ यांनी व्यक्त केले. या प्रसंगी अलखैर नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने प्रा. नानासाहेब गाठाळ यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या सदिच्छा भेटीवेळी पतसंस्थेचे व्यवस्थापक, सर्व कर्मचारी वृंद तसेच शहरातील इतर मान्यवर उपस्थित होते.

# शहीद पॅरा कमांडो भाकरेंचा मुलगा झाला लेफ्टनंट:वडिलांचे बलिदान, आईचे स्वप्न आणि मुलाची झेप, हे यश पाटोदेकरांसाठी अभिमानास्पद

पाटोदा । दिव्य न्युज

माझ्या वडिलांनी देशासाठी जे केलं, तेच माझ्यासाठी प्रेरणा आहे. मी जे काही आहे, ते त्यांच्या आणि माझ्या आईच्या त्यागामुळेच. नुकत्याच झालेल्या पासिंग आऊट परेडनंतर लेफ्टनंट आदित्य संजय भाकरे बोलत होता. आवाजात आत्मविश्वास होता, डोळ्यांत अभिमान आणि मनात देशासाठी काहीतरी करण्याची जिद्द देखील दिसून आली. पाटोदा गावाचा नावलौकिक वाढवणारी ही कहाणी आहे शहीद पॅरा कमांडो संजय भाकरे आणि त्यांच्या मुलगा आदित्य भाकरे यांची. शहीद वडिलांच्या आठवणींवर उभा राहून आदित्यने भारतीय सैन्य दलात अधिकारी होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले आहे. पाटोदा येथील रहिवासी असलेले संजय भाकरे हे भारतीय सैन्य दलात पॅरा कमांडो म्हणून कार्यरत होते. अंगी असलेल्या शौर्य, धैर्य आणि कौशल्यामुळे त्यांनी हे अत्यंत मानाचं पद मिळवलं होतं. २३ मार्च २००९ रोजी काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यात त्यांची पोस्टिंग होती. दुर्गम जंगलात अतिरेक्यांचा वावर असल्याची माहिती मिळाल्यानंतर संजय भाकरे आपल्या पथकासह कारवाईसाठी रवाना झाले. झालेल्या जोरदार चकमकीत संजय भाकरे यांनी काही अतिरेक्यांना ठार केले. मात्र या धाडसी कारवाईदरम्यान त्यांच्या डोक्यात थेट गोळी लागली आणि ते देशासाठी शहीद झाले. आजही शहरातील 'शहीद चौक' येथील संजय भाकरे यांचे स्मारक



त्यांच्या बलिदानाची साक्ष देत उभे आहे. शहीद संजय भाकरे यांच्या पश्चात पत्नी सारिका, मुलगा आदित्य आणि एक मुलगी असा परिवार आहे. पतीच्या शहादतीनंतरही सारिका भाकरे यांनी खचून न जाता मुलाच्या मनात देशभक्तीची ज्योत तेवत ठेवली. माझा मुलगाही वडिलांसारखाच देशासाठी काहीतरी करावा, हा निर्धार त्यांनी मनाशी धरला. त्या निर्धारातून आदित्य भाकरे याला अहिल्यानगर येथील लष्करी विद्यालयात शिक्षणासाठी पाठवण्यात आले. पहिली ते बारावीपर्यंत त्याने तेथे शिक्षण घेतले. बारावीमध्ये असतानाच आदित्यने नॅशनल डिफेन्स अकॅडमी (एनडीए)ची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली आणि अधिकारी होण्याच्या स्वप्नाला पहिली पायरी मिळाली. यानंतर पुणे येथील खडकवासला लष्करी कॅम्पमध्ये तीन वर्षांचे अत्यंत खडतर प्रशिक्षण त्याने पूर्ण केले. लष्करातील विविध अंगांचे कठोर प्रशिक्षण घेतल्यानंतर त्याची देहराडून येथे विशेष प्रशिक्षणासाठी निवड झाली. आणखी एक वर्ष कष्ट, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर त्याने ते प्रशिक्षणही यशस्वीपणे पार पाडले. अखेर १३ डिसेंबर रोजी पार पडलेल्या पासिंग आऊट परेडनंतर आदित्य संजय भाकरे हा रुजू झाला. आदित्य भाकरे .



जिंतूर शहरातील उस्मानपूरा येथे माझे शेजारी मो आजम कुरेशी यांच्या मुलगा मो. बिलाल कुरेशी यांचा साखरपूडा चा कार्यक्रम दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या धाटात सपन्न झाला या वेळी नवरदेव व त्याचे वडील यांना शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी सेवानिवृत मुख्यध्याापक शेख सादेक कुरेशी, व दैनिक दिव्य-वार्ता चे पत्रकार सालेह चाऊस दिसत आहेत.

# जिल्ह्यातील आमदार यांच्यामुळेच कामगार मजूर शासन योजने पासून वंचित-शेख अमर

बीड । दिव्य न्युज

राज्यातील बांधकाम कामगार यांच्या विकासासाठी राज्य सरकारने दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यातील कोणतेही कामगार वंचित राहू नाही



या मुळे विधानसभा सदस्य हा त्या मतदारसंघातील समिती अध्यक्ष असून ती समिती गठीत करून कामगार विभागाची बैठक लावून त्यांनी कामगारांचे रखडलेले प्रश्न मार्गी लावावे असे असून सुद्धा बीड जिल्ह्यातील एकाही आमदाराने जिल्ह्यातील कामगार योजने पासून का वंचित आहे हे जाणण्याचे प्रयत्न सुद्धा केले नाही

या बाबत असे बांधकाम कामगारांच्या विकासासाठी कामगार कल्याण मंडळ प्रणालीवर प्राप्त होणाऱ्या कामगारांची नोंदणी नूतनीकरण लाभच्या अर्जावर सध्या सर्व निर्णय ठम्म असल्या कारणाने जिल्ह्यातील अनेक कामगार हे योजने पासून वंचित असल्याने महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेच्या वतीने दिनांक १५/१२/२०२५ रोजी बीड जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी यांना सरकारी कामगार अधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले तत्काळ बांधकाम कामगार विधानसभा स्थानिक नियंत्रण समिती गठीत करून बैठका घेऊन कामगारांचे रखडलेले प्रश्न मार्गी लावावे असे संघटनेचे प्रदेश अध्यक्ष अमर शेख यांनी म्हटले.

# लग्न समारंभात पाहुणे बनून चोरी करणारी 'सिसोदिया गँग' गजाआड

## नंदुरबारला चोरी करून बीडमध्ये प्रवेश

नंदुरबार जिल्ह्यात याच टोळीने बॅग लिफ्टिंग केली होती. तेच पैसे घेऊन हे चोरटे बीड जिल्ह्यात आले होते. केजमध्ये एका बँकेत त्यांनी लुटण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. त्यामुळे ते बीड शहरात येत होते. परंतु त्या आधीच त्यांना मस्साजोगजवळ पोलिसांनी बेड्या ठोकल्या.

बीड । दिव्य न्युज

लग्न समारंभात पाहुणे किंवा भिकारी बनून दागिने चोरणे, तसेच अंगावर टोमॅटो सॉस टाकून नागरिकांचे लक्ष विचलित करत पाकीटमारी करणे, अशा आंतरराज्यीय गुन्ह्यांची 'मोडस ऑपरेंडी' (गुन्हा करण्याची पद्धत) असलेल्या टोळीला बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने पाठलाग करून अटक केली आहे. मध्यप्रदेशातील या टोळीने बीड, अंबाजोगाई आणि गेवराई परिसरात धुमाकूळ घातला होता.

बादल कृष्णा सिसोदिया (वय २४), काला उर्फ ऋतिक महेश सिसोदिया (वय २९), दीपक दिलीप सिसोदिया (वय २९) आणि जस्वंत मनिलाल सिसोदिया (वय २७) (सर्व रा. गुलखेडी, ता. पाचोर, जि. राजगड, मध्यप्रदेश) अशी पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. या टोळीतील आरोपींची चोरी करण्याची पद्धत अत्यंत वेगळी होती. ते लग्न समारंभात पाहुण्यांच्या किंवा भिकाऱ्यांच्या वेशात जात दागिने चोरत. तसेच, बँकेतून पैसे काढणाऱ्या लोकांवर पाळत ठेवून त्यांच्या पैशांची बॅग हिसकावणे, तसेच अंगावर टोमॅटो सॉस टाकून नजर हटवून हातातील पैसे घेऊन पळून जाणे, अशा पद्धतीने ते नागरिकांची फसवणूक करत. १२ डिसेंबर रोजी हे चौघे चोरीच्या दुचाकी घेऊन केजमध्ये एका बॅग लुटण्याच्या इराद्याने आले होते, परंतु त्यांचा प्लॅन फसला. ते दोन विना क्रमांकाच्या दुचाकीवरून बीडकडे पळत होते. याच दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला त्यांचा संशय आला आणि पोलिसांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. यातील दोघांना पोलिसांनी जागीच पकडले, तर उर्वरित दोघांना मस्साजोगपर्यंत पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यांना सामान्य लोकांनीही मदत केली. पोलिसांनी त्यांच्याकडून दोन चोरीच्या दुचाकी, मोबाइल असा एकूण अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या टोळीला अटक केल्याने या परिसरातील अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.



## लग्नात लहान मुलेही करतात चोरी

लग्न समारंभात याच सिसोदिया गँगमध्ये मोठ्यांसोबत लहान मुलेही असतात. नवरीच्या खोलीत अथवा गर्दीचा फायदा घेऊन महिलांच्या पर्स चोरी करण्याचे काम ही लहान मुले करतात. यापूर्वी बीड, आष्टीमध्ये असेच प्रकार घडले होते. तसेच छत्रपती संभाजीनगर पोलिसांनीही अशा प्रकारची टोळी पकडली होती. आता बीड पोलिसांनीही ही टोळी पकडली आहे. त्यांच्या साथीदारांचा शोध सुरू आहे.

## या पथकाने केली कामगिरी

एलसीबीचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, उपनिरीक्षक महेश विघ्ने, बप्पासाहेब घोडके, राजू पठाण, महेश जोगदंड, युनूस बागवान, भागवत शेलार, गणेश मराडे आदींनी केली. पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर अधीक्षक सचिन पांडकर यांनी त्यांना मार्गदर्शन केले.



बीड | गेवराई | परळी | धारुर | माजलगाव | अंबाजोगाई

# पिसाळलेला "नि"तीश...!

## मुख्यमंत्र्यांच्या वेशातला दलबदलू व्यभिचारी..!








काल पटणा बिहार मध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी डॉ. नुसरत परवीन या महिलेचा हिजाब ओढून तिचा विनयभंग केल्याची बातमी समोर आलीय.

नेहमी राजकीय पलटी मारणारे नितेश काल मात्र सदाचारावरून व्याभिचारावर पलटी मारतांना दिसले. आजवर डोक्यात टोपी घालून मुस्लिमांची मतं घेत सत्ता भोगणाऱ्या नितीशने अचानक भाजपच्या विचारावर चालत असल्याचा चक्क पुरावा दिल्याचं दिसून येत आहे.

मुळात व्यभिचाराच्या अंधारात मुख्यमंत्री नितीशकुमार हे विसरले आहेत की हिजाब हा केवळ कपड्याचा तुकडा नाही, तर मुस्लिम महिलांच्या श्रद्धा, संस्कार आणि वैयक्तिक निवडीचे प्रतीक आहे. इस्लाम धर्मात लज्जा, शालीनता आणि आत्मसन्मानाला विशेष महत्त्व दिले जाते. हिजाब ही त्याच मूल्यांची प्रत्यक्ष अभिव्यक्ती मानली जाते. कुरआनमध्ये स्त्री–पुरुष दोघांनाही संयम, नम्रता आणि शालीनतेचे पालन करण्याचे आदेश दिले आहेत. हिजाब परिधान करणे ही अनेक मुस्लिम महिलांसाठी धार्मिक कर्तव्याबरोबरच स्वतःच्या अस्मितेचा अभिमान आहे. तो स्त्रीच्या बुद्धिमत्तेला, चारित्र्याला आणि व्यक्तिमत्त्वाला तिच्या बाह्य सौंदर्यापेक्षा अधिक महत्त्व देतो.

बिहारच्या राजकारणात १० वेळा सत्ता भोगणाऱ्या मुख्यमंत्र्याने लाज विकून सत्ता कमवल्याचा इतिहास कमालीचा आहे हे ही इथे मुद्दाम नमूद करावं वाटतं.

सबका साथ, सबका विकास ही धोरणे स्वीकारुन मुस्लिम महिलांचा अवमान करणाऱ्या नितीशकुमारला भाजप सरकार बिहार भूषण पुरस्काराने सन्मानित जर केले तर यात नवल वाटून घेण्याच काहीही कारण नाही....!

महिलांचा अपमान, चारित्र्याचा खेळखंडोबा, खोट्या आश्वासनांच्या जाळ्यात अडकवून मानसिक शोषण– अशा नेत्याची ओळख असते. बाहेरून सभ्यतेचा मुखवटा, भाषणांत नैतिकतेचे धडे; पण आतून मात्र विकृत विचारांची घाण ही हळूहळू पोसेल असं दिसून येत आहे. हिजाब ओढण्याचा प्रयोग हा जरी पहिला असला तरी येणाऱ्या काळात मुस्लिम महिलांच्या हिजाबला बॅन करण्याचा हा डाव नक्कीच असू शकतो.

पत्रकार नदीम शेख–९३७०४५७७२७



महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन जालना जिल्हा आयोजित बॉडी बिल्डिंग असोसिएशन यांच्या द्वारे आयोजित केलेल्या मराठवाडा श्री–२०२५ बॉडी शो मध्येओपन कॅटेगरी मध्ये तृतीय क्रमांक पटकवणारे सय्यद इरफान पटेल यांनी मराठवाडा व माजलगाव न्यु लाईफ फिटनेस क्लब चे नाव गाजवल्या बदल हार्दीक शुभेच्छा व पुढील वाट चालीस हार्दीक हार्दीक अभिनंदन

# तलाठी व मंडळाधिकारी १५ डिसेंबर पासून संपावर

## नागरीकांना ऑनलाइन तात्काळ सुविधा पुरविण्यासाठी लॅपटॉप व इतर साधनसामुग्रीचा तातडीने पुरवठा करावा या मागणीसाठी महसूल विभागाचे क्षेत्रीय कामकाज ठप्प ;जिंतुर महसुल चे कर्मचाऱ्याचा समावेश



जिंतूर/परभणी । दिव्य न्युज : सालेह चाऊस

परभणी जिल्ह्यातील महसूल विभागातील क्षेत्रीय स्तरावरील महत्त्वाचे असलेले ग्राम महसूल अधिकारी(तलाठी )आणि मंडळाधिकारी आजपासून सोमवार(दि. १५) संपावर गेले आहेत. नागरिकांना तातडीने ऑनलाईन सुविधा मिळण्यासाठी लँपटॉप आणि इतर संबंधित साधनसामुग्री तातडीने पुरवठा करावा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (डिएसएससी) प्रशासनाकडे जमा करून संप पुकारला आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाच्या क्षेत्रीय स्तरावरील सर्व कामकाज ठप्प झाले आहे. महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने मागण्यांचे निवेदन संबंधित तहसीलदारांना दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, मागील १० वर्षापासून ग्राम महसूल अधिकारी(तलाठी) आणि मंडळाधिकारी यांना लॅपटॉप आणि इतर साधनसामुग्री मिळालेली नाही. त्यामुळे नागरिकांना द्यावयाचे सातबारा, ८ अ, फेरफार नक्कल आदी सेवा देण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे. संगणकीय साहित्याचे आयुर्मान शासन निर्णयानुसार ५ वर्ष असल्याचे निश्चित केले होते. मात्र १० वर्षाचा कालावधी उलटूनही आणि ही उपकरणे पूर्णता कालबाह्य, नादुरुस्त आणि निकृष्ट अवस्थेत असल्याने नागरिकांना ई – फेरफार, ई – हक्क, ई – पिकपाहणी, ई – पंचनामा यासारख्या सुधारित प्रणालींवर काम करणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य होत नाही. ऑनलाईन प्रणालीतील नोंद घेणे, प्रस्ताव मंजूर करणे या आणि अशा आवश्यक सेवा वेळेत देणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत ई – शासन प्रणालीवर शासनाच्या विश्वासार्हतेलाही तडा पोहोचतो. परिणामी कर्मचारी वर्गात या कालबाह्य आणि नादुरुस्त उपकरणांवर काम करणे म्हणजे गंजलेल्या तलवारीने लढाई लढण्यासारखे असे नमूद करत कर्मचाऱ्यांमध्ये असहाय्यता,

►► पान २ वर

# नायलॉन मांजा विक्रेत्यांवर होणार थेट कारवाई; पोलिसांचा इशारा

अंबाजोगाई । दिव्य न्युज

संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई शहर पोलिसांनी नायलॉन मांजाविरोधात कंबर कसली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शहरात नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक आणि वापर करण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून, नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याने जारी केलेल्या पत्रकानुसार, नायलॉन मांजा मानवी जीव आणि पक्षांसाठी घातक आहे. त्यामुळे जो कोणी या मांजाची विक्री किंवा साठवणूक करताना आढळेल, त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. नागरिकांनी देखील अशा प्रकारची माहिती पोलिसांना द्यावी, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. माहितीसाठी ९२२५०९२८२३ हा क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे.



# आता बनावट औषधांची मात्रा चालणार नाही; जागेवरच निकाल लागणार..!

## राज्य सरकारचा निर्णय : राज्यात 'काउंटरफिट ड्रग डिटेक्शन डिव्हाइस' खरेदी करणार






बीड । दिव्य न्युज

राज्यातील शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये बनावट आणि भेसळयुक्त औषधांच्या वाढत चाललेल्या तक्रारींवर अखेर राज्य सरकारने कठोर उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक असलेल्या या समस्येवर नियंत्रण मिळविण्यासाठी आता राज्य सरकार 'काउंटरफिट ड्रग डिटेक्शन डिव्हाइस' ही अत्याधुनिक उपकरणे खरेदी करणार आहे. या नव्या उपकरणांमुळे महाराष्ट्रातील औषध वितरणाच्या साखळीत मोठी सुधारणा होईल आणि नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवता येईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### भेसळीवर तातडीने होणार कारवाई

जागेवरच बनावट औषध आढळल्यास संबंधित विक्रेता, पुरवठादार किंवा उत्पादकावर तातडीने व कठोर कारवाई करणे प्रशासनाला शक्य होणार आहे.

### १.१९ कोटींना एक, अशा आठ मशीनची खरेदी

राज्य सरकार एकूण ८ अत्याधुनिक 'काउंटरफिट ड्रग डिटेक्शन डिव्हाइस' खरेदी करणार आहे. एका मशीनची किंमत अंदाजे १ कोटी १९ लाख रुपये इतकी आहे.

### औषधांची गुणवत्ता जागेवरच तपासून निकाल

या नवीन डिव्हाइसमुळे औषधांची गुणवत्ता, रासायनिक संरचना आणि वैधता जागेवरच तपासता येणार असून, काही मिनिटांतच औषध बनावट आहे की नाही, याचा निकाल मिळणार आहे.

### अंबाजोगाईत बनावट गोळ्यांवर गुन्हे

मागील वर्षात अंबाजोगाई स्वाराती रुग्णालयात बनावट गोळ्यांचा पुरवठा झाल्याचे उघड झाले होते.
याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हेही दाखल झाले होते. असेच गुन्हे राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही दाखल झालेले आहेत.

### शेकडो नमुने आढळले बोगस

मागील काही वर्षामध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाने तपासलेल्या औषधांच्या शेकडो नमुन्यांमध्ये भेसळ आणि बनावटपणा आढळला आहे.

### आठ उपसंचालक कार्यालयांना देणार उपकरणे

ही महागडी उपकरणे अन्न व औषध प्रशासनाच्या राज्यातील आठ उपसंचालक कार्यालयाना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२–२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२–२३१२२०